सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
दूरध्वनी क्र. /Tel. No. 2262 1220

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),गुन्हे शाखा, मुंबई यांचे कार्यालय.
Office of the
DY.Commissioner of Police (Detection),
Crime Branch, Mumbai.

ई-मेल:- cp.mum.dcp.det@mahapolice.gov.in

जा.क्र./OW.No. 542 /पोउआ/प्रकटीकरण /2024 दिनांक/Date : 26 /04/2024

प्रति,

प्रभारी पोलीस निरीक्षक,
पोलीस परिपत्रक कार्यालय,
मुंबई

विषय :– Best Detection of the Month Febuary – 2024 ''उत्कृष्ट गुन्हे शोध'' व Best Conviction of the Month Febuary– 2024 ''उत्कृष्ट अपराधसिध्दी'' पोलीस नोटीस व वेबसेल मध्ये प्रसिध्द करणेबाबत...

मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे वतीने मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस अधिकारी, अंमलदारांना बेस्ट डिटेक्शन/बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ अर्थात उत्कृष्ट गुन्हे शोध, उत्कृष्ट अपराधसिध्दी याकरीता प्रत्येक महिन्याला निवड करण्यात येते.

माहे फेब्रुवारी –२०२४ करीता '' **बेस्ट डिटेक्शन अर्थात ( उत्कृष्ट गुन्हे शोध ) तसेच बेस्ट कनव्हिक्शन अर्थात ( उत्कृष्ट अपराधसिध्दी)** '' याकरीताचे खालील नमुद पोलीस ठाणे याची निवड करण्यात आलेली आहे. तरी सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

**अ) माहे फेब्रुवारी – २०२४ करीताचे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ –**

१) गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष–०७, मुंबई गु.र.क्र. २५/२४ कलम ३०२ भा.दं.वी.सं
( कांजुर मार्ग पोलीस ठाणे पोलीस ठाणे)

२) शिवडी पोलीस ठाणे, बंदर परिमंडळ, मुंबई गु.र.क्र. ३६/२०२४ कलम ३०२,२०१ भादवि

**ब) माहे फेब्रुवारी – २०२४ करीताचे बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ –**

कफ परेड पोलीस ठाणे, परिमंडळ–०१, मुंबई. २९३/२१ कलम ३०२, ३७६(ड)(ब), ३६३, २०१, ३४ भा.दं.वि. सह कलम ४, ६, ८, १० पोक्सो

सदर उत्कृष्ट गुन्हे शोध (बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ ) व उत्कृष्ट अपराधसिध्दी (बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ ) बाबतची माहिती सोबत जोडण्यात आली असून सदरची माहिती पोलीस नोटीस व मुंबई पोलीसांचे वेबसेल वर प्रसिध्द करण्यात यावी.

सही/–
पोलीस उप–आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, गु.अ.वि., मुंबई.

प्रत:–

वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वेबसेल, पोलीस आयुक्त कार्यालयाचे आवार, मुंबई.

**मजकुर :—**

दिनांक २४/०४/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **“ Best Detection of the Month ’’** माहे फेब्रुवारी —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) १) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ फेब्रुवारी —२०२४

| | | |
|---|---|---|
| **०१** | **गु.प्र.शा.गु.अ.वि. कक्ष—०७, मुंबई** | **कांजुरमार्ग पोलीस ठाणे गु.र.क्र. २५/२०२४ कलम ३०२ भा.दं.वी.सं.** |

**—: “ जीवे ठार मारणे ’’:—**

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमूद गुन्हयात दि. ०६/०२/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजेच्या पुर्वी फिर्यादी श्रीमती शकुंतला वसंतलाल गुप्ता, वय ४६ वर्षे, यांच्या मालकीचे असलेल्या व सध्या भाडेतत्वार राहण्यास दिलेल्या रूम नं.०३, रूपाबाई चाळ, निवार्णा बिल्डींगच्या मागे, कांजुरमार्ग पुर्व, मुंबई यामध्ये भाडेकरू राजेश सियाराम यादव, वय २४ वर्षे, याने त्याची पत्नी दिपा राजेश यादव, वय २३ वर्षे हिला कोणत्यातरी कारणासाठी जीवे ठार मारून तिचा मृतदेह कापडी पट्टीने हात—पाय बांधुन बेडशीटमध्ये गुंडाळुन पळुन गेला अशी तक्रार दिल्यावरून आरोपीताविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती शकुंतला वसंतलाल गुप्ता, वय ४६ वर्षे, |
| बळीत | :— | दिपा राजेश यादव, वय २३ वर्षे |
| आरोपी अटक व दिनांक | :— | राजेश सियाराम यादव, वय २४ वर्षे,<br>अटक दिनांक — ०७/०२/२०२४ |

**तपास कौशल्य :—** गुन्हा नोंद झाल्यानंतर गुन्हयातील आरोपी राजेश सियाराम यादव याचा तो कामास असलेल्या डि—मार्ट, कांजुरमार्ग, मुंबई या ठिकाणी शोध घेतला असता राजेश यादव हा मागील ०२ दिवसांपासुन कामावर आला नसल्याची माहीती मिळाली. त्यानंतर मिळालेल्या माहीतीवरून आरोपीच्या पवई, मुंबई येथील मित्रांकडे चौकशी केली असता त्यांच्याकडुन काहीही उपयुक्त माहीती मिळुन आली नाही.

नमुद गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा असल्याने तसेच आरोपी हा परराज्यातील असल्याने व तो पळुन जाण्याची शक्यता असल्याने मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), बृहन्मुंबई यांनी सदर गुन्हयाची गंभीरता ओळखुन सदरचा गुन्हा उघडकीस आणण्याच्या सुचना दिल्या होत्या. सदरचा गुन्हा हा महीलेविरूद्धचा तसेच गंभीर स्वरूपाचा असल्याने पोलीस निरीक्षक आत्माजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली तपास चालु केला.

सदर आरोपीताचा शोध घेण्याकरीता कक्ष—७ कार्यालयाकडुन वेगवेगळी पथके तयार करण्यात आली. सदर वेगवेगळया पथकांकडुन सी.सी.टी.व्ही फुटेज पाहणे, आरोपीबाबत गोपनीय माहीती प्राप्त करणे, आरोपीताचा तांत्रिक तपासाद्वारे शोध घेण्याचे प्रयत्न चालु करण्यात आले. आरोपीताबाबत गोपनीय माहीती घेत असताना त्याचे व त्याचे मयत पत्नीचे असे एकुण ०३ मोबाईल क्रमांक प्राप्त करण्यात आले. सदरचे मोबाईल क्रमांकाचे सी.डी.आर. व एस.डी.आर. प्राप्त केले असता सर्व मोबाईल दि. ०५/०२/२०२४ रोजी पहाटे ०४:०० वाजेपर्यंत चालु असुन त्यानंतर ते बंद असल्याचे दिसुन आले.

मोबाईलचे शेवटचे लोकेशन कांजुरमार्ग, मुंबई परिसरातील असल्याचे दिसुन आले. त्यावरून सदर परिसरातील सी.सी.टी.व्ही. फुटेज पहावयास सुरू केले. सदर वेळी सी.सी.टी.व्ही. फुटेज पाहत असताना आरोपी कांजुरमार्ग परीसरातील डी.मार्ट येथे ोवटी टेम्पो लावुन चालत जात असल्याचे दिसुन आले. त्यावरून आरोपीचा मुंबई परिसरातील साधारण एकुण ९० ते ९५ सी.सी. टी.व्ही. कॅमेरे पाहुन त्याचा मागोवा घेण्यात आला. त्यामध्ये आरोपी जात असलेल्या मार्गावरून पुढे गेलो असता आरोपी हा लोकमान्य टिळक रेल्वे स्टेशन, मुंबई येथुन उत्तरप्रदेश येथे जाणाऱ्या रेल्वेमध्ये जात असल्याची खात्री झाली. त्यावरून मा.पोलीस उप—आयुक्त, प्रकटीकरण—०१, गुन्हे

शाखा, मुंबई यांच्या परवानगीने तात्काळ एक पथक दिनांक ०७/०२/२०२४ रोजी राज्य–उत्तरप्रदेश येथील आरोपीताचे मुळ गावी पाठवण्यिात आले.

दरम्यानच्या कालावधीत आरोपीताने वापरलेले एकुण ०३ मोबाईलचे एकुण ०९ आय.एम. ई.आय. क्रमांक प्राप्त झाले. सदरचे ०९ आय.एम.ई.आय. चे आय.एम.ई.आय.सी.डी.आर.प्राप्त करण्यात आले. त्यापैकी एका आय.एम.ई.आय मध्ये ७३०७८३०६८४ हा क्रमांक चालु झाल्याचे दिसुन आले व त्या मोबाईल क्रमांकाचे लोकेशन हे जिल्हा गाझीपुर, राज्य–उत्तरप्रदेश येथील असल्याचे दिसुन आले. सदर मोबाईल क्रमांकाचा एस.डी.आर.प्राप्त केला असता एस.डी.आर. हा राजेश सियाराम यादव या आरोपीच्या नावे असल्याचे दिसल्याने सदरचा क्रमांक आरोपी हा वापरत असल्याची खात्री झाली.

आरोपीचा शोध घेणेकामी उत्तरप्रदेश येथे गेलेल्या पथकाने त्याच्या मुळ गावी शोध घेतला परंतु तो मिळुन येत नव्हता. दरम्यानच्या कालावधील आरोपीने घेतलेल्या नवीन मो. क्रमांकाचा सी. डी.आर प्राप्त केला असता त्यावरून ९११८०३८०२५ या क्रमांकावर कॉल झाल्याचे दिसुन आले. तसेच ९११८०३८०२५ हाच मोबाईल क्रमांक हा आरोपीने नवीन सीम कार्ड खरेदी करतेवेळी Alternate Number म्हणुन दिल्याचे दिसुन आले. त्यावरून सदर आरोपीताच्या नवीन क्रमांकाचे व सदर कॉलरचे लोकेशन घेतले असता ते एकाच टॉवर मधील असल्याचे दिसुन आले.

सदरचे लोकेशन हे आरोपीताच्या मुळ गावापासुन साधारण ७०–८० किलोमीटर लांब असल्याचे दिसुन आले. त्यांनतर सदरची माहीती उत्तरप्रदेश येथील आरोपीताच्या मुळ गावाजवळ असलेल्या कक्ष–०७ च्या पथकास दिली. सदर पथकाने तात्काळ गाव–नैसारे, ता.सैदापुर, जि. गाझीपुर, उत्तरप्रदेश येथे जावुन आरोपीचा कॉलर नामे कमलेश दर्शन कुमार यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे कौशल्यपुर्ण विचारपुस करून आरोपी राजेश सियाराम यादव याचेबाबत विचारपुस केली असता त्याने राजेश यादव हा एका धोब्याच्या घरामध्ये राहत असल्याची माहीती दिली. त्यावरून पथकाने आरोपीतास दिनांक ०७/०२/२०२४ रोजी रात्रौच्या सुमारास गाव–नैसारे, ता.सैदापुर, जि. गाझीपुर, उत्तरप्रदेश येथुन ताब्यात घेवुन  कक्षात आणले व त्याची वैद्यकीय तपासणी करून त्यास पुढील कारवाईकरीता कांजुरमार्ग पोलीस ठाणेच्या ताब्यात दिले.

तरी कक्ष ७, गु.प्र.शा. गु.अ.वि. घाटकोपर, मुंबई मधील नमुद अधिकारी व अंमलदार यांनी मा. वरिष्ठांचे मार्गदर्शना नुसार खुन करून परराज्यात पळुन गेलेला गंभीर गुन्हयातील आरोपी हा गाव–नैसारे, ता.सैदापुर, जि.गाझीपुर, उत्तरप्रदेश येथे असल्याचे तांत्रीक तपासाद्वारे निष्पन्न केले. आरोपीताचा ठाव ठिकाणा मिळाल्यानंतर त्यास ताब्यात घेऊन खुनाचा गंभीर गुन्हा २४ तासांचे आत उघडकीस आणलेला आहे.

**गु.प्र.शा.गु.अ.वि.कक्ष—०७, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक, | आत्माजी सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | म.पोलीस निरीक्षक, | राजश्री बाळगी | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक, | निरज उबाळे | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस उप निरीक्षक | रामदास तात्याबा कदम | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक | स्वप्निल रामदास काळे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस उप निरीक्षक | महेश शेलार | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोलीस उप निरीक्षक | नामदेव विठोबा परबळकर | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | म.स.पो.उ.नि.क्र. ०४११०४ | निधी निलेश धुमाळ | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | म.स.पो.उ.नि.क्र. ५४० | स्नेहा चंद्रकांत नाईक | प्रशस्तीपत्रक |
| १० | स.पो.उ.नि.क्र. ३०७१७ | अरूण सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ११ | स.पो.उ.नि.क्र. ३०९४१ | तानाजी उबाळे | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्र. ३१३४७ | दिपक पुषोत्तम पवार | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह.क्र. ३२८०७ | संतोष गुरव | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र. ३४१७७ | राजेंद्र भिमाजी शिंदे | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र. ९६०१८३ | सुभाष सुर्यकांत मोरे | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह.क्र. ९६०५५२ | शशिकांत कृष्णा कांबळे | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ह.क्र. ९६०६३३ | अजय बल्लाळ | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ह.क्र. ९७०६५१ | गिरीश जोशी | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ह.क्र. ९७०९४४ | अस्लम महम्मद शेख | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ह.क्र. ००.३५१ | विनोद शिरापुरी | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.ह.क्र. ०३.४६७ | सचिन गलांडे | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.ह.क्र. ०३.८३५ | प्रमोद सोमनाथ जाधव | प्रशस्तीपत्रक |
| २३ | पो.ह.क्र. ०५.०५५८ | सीमा तिरोडकर | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.ना.क्र. ०६.१९४० | विलास राऊत | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.शि.क्र. ०८.०५०० | लुकमान सय्यद | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.शि.क्र. ०८.०८७२ | विकास होनमाने | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.शि.क्र. ०९.०४६४ | महेश सावंत | प्रशस्तीपत्रक |
| २८ | म.पो.शि.क्र.११.२१५३ | हिना फहाद शेख | प्रशस्तीपत्रक |
| २९ | म.पो.शि.क्र.१४.१२६५ | सावित्री जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ३० | पो.ह.चा.क्र. ९८०८०७ | संतोष धुमाळ | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | पो.ह.चा.क्र. ००.६८८ | राजाराम कदम | प्रशस्तीपत्रक |
| ३२ | पो.शि.चा.क्र. १५.०८६३ | दिलीपराव राठोड | प्रशस्तीपत्रक |

# २) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ फेब्रुवारी —२०२४

| ०२ | शिवडी पोलीस ठाणे, बंदर परिमंडळ, मुंबई | गु.र.क्र. ३६/२०२४ कलम ३०२,२०१ भादवि |
|---|---|---|

—: “ दगडाने ढेचून हत्या ”:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत :—** नमूद गुन्हयांत दिनांक २२/०१/२०२३ रोजी सकाळी ०९:३० वा. शिवडी पोलीस ठाणे हद्दीत बी.पी.सी.एल कंपनीचे पाठीमागे, गणेश मंदीराचे जवळ, गर्द झाडीमध्ये एका अनोळखी महिलेचा कुजलेल्या अवस्थेत चेहरा विच्छीन्न केलेल्या स्थितीत मृतदेह मिळून आला. सदर घटनेबाबत प्रथम अपमृत्यु क्रमांक ९/२०२४, कलम १७४ फौ.प.सं प्रमाणे नोंद घेवून महिलेच्या मृतदेहाचे शवविच्छेदनाकरीता के.ई.एम रूग्णालय, मुंबई येथे पाठविण्यात आला. रूगणालयालयाचे वैदयकिय अधिकारी यांनी तिच्या मृत्युचे कारण हे “HEAD INJURY” असल्याचे निदान केले. यावरून सदर अनोळखी महिलेचा मृत्यु हा अज्ञात इसमाने तिला जिवे ठार मारून पुरावा नष्ट करणे करीता तिचा चेहरा जाणिवपुर्वक विद्रुप केलेला असल्याने अज्ञात इसमाचे विरोधात कलम ३०२, २०१ भा.द.वि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री वाल्मकि एकनाथ महाजन वय—३८ वर्षे, |
| बळीत | :— | श्रीमती. सपना सतिश बातम, वय ४० वर्षे, |
| आरोपी अटक व दिनांक | :— | शहजादा उर्फ रमजान शफि शेख, वय ३७ वर्षे,<br>अटक दिनांक — ०२/०२/२०२४ |

**तपास कौशल्य :—** सदरचा गुन्हा नोंद करण्यात आले नंतर मा.पोलीस उप आयुक्त, बंदर परिमंडळ, मुंबई यांनी तपासाचे अनुषंगाने महत्वाच्या सुचना दिल्या. नमूद गुन्हयाचे घटनास्थळ हे दिवसा कमी वर्दळीचे, रात्रीचे वेळी निर्मनष्य असे असून जवळ पास सि.सि.टिव्ही. फुटेज नसणे व मयत महिलेचा मृतदेह हा कुजलेल्या, चेहरा विच्छन्न अवस्थेत असल्याने तिला ओळखणे व गुन्हा उघडकीस आणणे हे आव्हानात्मक होते.

मा. वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे शिवडी , वडाळा व यलोगेट पोलीस ठाणेंची एकूण ८ पोलीस पथके तयार करण्यात येवून त्याचे मार्फतीने मयत महिलेचे ओळख पटविणे करीता एकूण १६२ हरविलेल्या महिलांची तपासणी करण्यात आली. मयत महिलेच्या अंगावर मिळून आलेला ऐवजाप्रमाणे शोध पत्रिका तयार करण्यात येऊन दक्षिण प्रादेशिक विभाग, मध्य प्रादेशिक विभाग व पुर्व प्रादेशिक विभातील सर्व पोलीस ठाणेच्या हद्दीत एकूण १,००० शोध पत्रिका चिटकविण्यात येवून व माहिती देवून प्रसिध्दी देण्यात आली.

गुन्हयाचा सातत्याने तपास करून प्राप्त माहितीच्या आधारे मयत महिला ही वारंगणा किंवा रोडसाईड असण्याची शक्यता असल्याने वेश्या व्यवसाय करणाऱ्या व रोडवर राहणाऱ्या एकूण २०० पेक्षा अधिक महिलांची भेट घेवून त्यांना मयत महिलेची व तिचे जवळील ऐवजाची माहिती व शोध पत्रिकेचे वाटप करण्यात येऊन मयत महिलेची ओळख पटविणेकरीता कसोशिने प्रयत्न करण्यात येत होते. गुन्हयाचे घटनास्थळाचे पासून काहीसे दुरू असे असलेल्या सिसिटिव्ही फुटेजचा आधार धरून, त्याचे दिनांक ०१/०१/२०२४ पासून दिनांक २२/०१/२०२४ रोजीच्या कालावधीचे दिवसरात्र सिसिटिव्ही फुटेजच्या बारकाईने तपासणी मध्ये एक महिला व पुरूष असे गुन्हयाचे घटनास्थळी जाताना व काही वेळानंतर फक्त पुरूष हा गुन्हयाचे घटनास्थळावरून एकटाच बाहेर येवून मोटार स्कुटर वर बसून भरधाव वेगाने जाताना दिसून आला.

सदर इसम हा संशयीत वाटत असल्याने त्या सिसिटिव्ही फुटेजच्या आधारे संशयीत स्कुटर

चालकाचा सातत्याने मागोवा घेण्यास तपासी पथकाने सुरवात केली. सदर संशयीत मोटार स्कुटर चालकाचा सिसिटिव्ही फुटेजच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात येवून त्याचेबाबत मुंबई सेन्ट्रल परीसरातून प्राप्त करण्यात आलेल्या माहिती प्रमाणे सदर संशयीत मोटार स्कुटर चालकाने नमूद गुन्हयातील मयत महिला श्रीमती. सपना सतिश बातम, वय ४० वर्षे असल्याचा शोध लावून तिची मुलगी सोनी हिचे मार्फतीने निश्चित करण्यात आले. तसेच संशयीत मोटार स्कुटर चालक शहजादा उर्फ रमजान शफि शेख, वय ३७ वर्षे असे असल्याचे समजून येवून त्याने मयत महिला हिला दारू पाजण्याचे बहाण्याने मोटार स्कुटर वर बसवून गुन्हयाचे घटनास्थळी आणून तिला दारू पाजून तिचे वर बळजबरीने बलात्कार करण्याच्या इरादयाने गुन्हयाचे घटनास्थळी गर्द झाडीमध्ये घेवून जावून बलात्कार करण्याचे प्रयत्न केला.

सदरवेळी महिलने प्रतिकार केला असता, त्याने तिला दगडाने ठेचून जिवे ठार मारले. तसेच तिची ओळख पटू नये याकरीता तिचा चेहरा विद्रुप केला व मयत महिलेचे पुर्ण शरीर हे प्लास्टिकने झाकून त्यावर लाकडी काडया व प्लायवूड ठेवून गुन्हयाचे घटनास्थळावरून पळून गेला. नमूदच्या गुन्हयात अनोळखी मयत महिलेच्या बाबत कोणतीही स्पष्ट अशी माहिती नसताना, जवळ पास ठोस असे सिसिटिव्ही फुटेज किंवा प्रत्यक्ष गुन्हा घडल्याचे बाबत माहिती सांगणारे कोणीही उपलब्ध नसताना उपलब्ध माहितीच्या आधारे सातत्याने प्रयत्न करून तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी आरोपीत इसमास अटक करण्यात यश प्राप्त केले आहे.

## शिवडी पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | सहाय्यक पोलीस आयुक्त | श्री.विजय भिसे, | प्रशस्तीपत्रक |
| २ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक, | श्री. रोहीत चंद्रकांत खोत | प्रशस्तीपत्रक |
| ३ | पोलीस निरीक्षक, | विशाल एकनाथ चंदनशिवे | प्रशस्तीपत्रक |
| ४ | पोलीस निरीक्षक, | शिवाजी पासलकर | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पोलीस निरीक्षक, | सचिन सदाशिव माने, | प्रशस्तीपत्रक |
| ६ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | सागर बन्सीलाल काळेकर, | प्रशस्तीपत्रक |
| ७ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | विश्राम जांलिदर मदने | प्रशस्तीपत्रक |
| ८ | सहाय्यक पोलीस निरीक्षक | स्नेहलसिंग रमेश खुळे | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पोलीस उप निरीक्षक, | शिवप्रसाद गणपत धुमाळ | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोलीस उप निरीक्षक, | प्रशांत सुरेश रनावरे | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पोलीस उप निरीक्षक, | वाल्मीक एकनाथ महाजन | प्रशस्तीपत्रक |
| १२ | स.पो.उ.नि. | सुनिल कळविकट्टी | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह.क्र.३४५१६ | भालचंद राजाराम गायकवाड | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र.९७०७५२ | विकास ाहाजी कदम | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र.००.४९३ | श्रीमंत संपत यादव | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह.क्र.०६.०११०६ | आशादुल्ला बागवाण | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.ह.क्र.०६.१६८३ | सुहास भागवन कासार, | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.शि.क्र. ०९.३२१२ | धनाजी उमाजी धायगुड | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.शि.क्र. ०९.०३५२ | कमरूलहक अब्दुल अजील शेख | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.शि.क्र. ०७.१५१७ | संदिप मारूती साळेकर | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.शि.क्र. ०९.३३८० | अप्पानंद सुभा ा जमादार | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.शि.क्र. ११.१६६१ | विश्वास जोरसिंग जाधव | प्रशस्तीपत्रक |

| | | | |
|---|---|---|---|
| २३ | पो.शि.क्र. ११.१६२७ | संतोष रामभाऊ आठरे | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.शि.क्र. १४.०५८५ | दिपक तुकाराम माळोद | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.शि.क्र. १४.०५४३ | अमोल एकनाथ लाड | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.शि.क्र. १३.०२७६ | उमेश उत्तम पाटील | प्रशस्तीपत्रक |
| २७ | पो.शि.क्र. ०९.१९३६ | महेश मधुकर गलांडे | प्रशस्तीपत्रक |
| २८ | पो.शि.क्र. ०९.१९३६ | निलेश प्रभाकर जगताप | प्रशस्तीपत्रक |
| २९ | पो.शि.क्र. १३.००४४ | प्रकाश पांडुरंग काटकर | प्रशस्तीपत्रक |
| ३० | पो.शि.क्र. १४.०२२३ | राहुल शहाजी पाटोळे | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | पो.शि.क्र. ११.०५०८ | सुहास प्रभाकर मखरे, | प्रशस्तीपत्रक |
| ३२ | पो.शि.क्र. ११.३२०४ | इद्रजित चंद्रकांत साळवे | प्रशस्तीपत्रक |
| ३३ | पो.शि.क्र. ११.३४१४ | अनिल विजय बाबर, | प्रशस्तीपत्रक |
| ३४ | पो.शि.क्र. ११.२९७८ | शिवाजी नागनाथ खारे | प्रशस्तीपत्रक |
| ३५ | पो.शि.क्र. १४.०५९५ | अशोक विठ्ठल बडे | प्रशस्तीपत्रक |
| ३६ | पो.शि.क्र. १४.०२८९ | बच्छाव | प्रशस्तीपत्रक |
| ३७ | पो.ह.क्र.०४.०९४१ | हंबीरराव एकनाथ घाडगे | प्रशस्तीपत्रक |

**मजकुर :—**

दिनांक २३/०४/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या ‘‘ **BEST CONVICTION OF THE MONTH** " माहे फेब्रुवारी —२०२४ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ फेब्रुवारी — २०२४

| | | |
|---|---|---|
| **०१** | **कफ परेड पोलीस ठाणे, परिमंडळ—११, मुंबई** | **गु.र.क्र. २९३/२१ कलम ३०२, ३७६(ड)(ब), ३६३, २०१, ३४ भा.दं.वि. सह कलम ४, ६, ८, १० पोक्सो** |

—: ‘‘ **अल्पवयीन मुलीचा बलात्कार करून खुन** ’’:—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात दिनांक ०९/०७/२०२१ रोजी रात्रो ०१.०० वा. च्या सुमारास फिर्यादी यांनी त्यांची अल्पवयीन मुलगी वय ०३ महिने हिला दुध पाजण्यासाठी पाहिले असता ती दिसली नाही म्हणुन त्या राहत असलेले परिसारात व नातेवाईकांकडे शोध घेतला असता ती मिळुन आली नाही. म्हणुन फिर्यादी यांच्या कायदेशीर रखवालीतुन कोणीतरी तिला पळवून नेले म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्रीमती. ज्योत्स्ना सचिन चितकोटे वय २८ वर्ष, |
| बळीत | :— | अल्पवयीन मुलगी वय ०३ महिने |
| निकाल दिनांक | :— | दि. २७/०२/२०२४ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | १) कन्हैय्या उर्फ कन्नु दत्ता चौगुले वय २२ वर्षे,<br>२) सोनु मनोज काळे वय २० वर्षे,<br>आरोपी क्र. १ अटक दिनांक ०९/०७/२१ रोजी<br>आरोपी क्र. २ अटक दि. ०९/०७/२०२१ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमुद गुन्हयात मा. न्यायालयाने आरोपीस फाशिची शिक्षा सुनावली आहे |

**तपास कौशल्य** :— सदर गुन्हयातील आरोपीतांनी गुन्हयातील अल्पवयीन बळीत अल्पवयीन मुलगी वय ०३ महिने हिस फिर्यादी यांच्या कायदेशीर रखवालीतुन पळवून नेऊन तिच्यावर अत्याचार करून तिला जिवंत गाडण्यात आले होते. त्यामुळे परिसरातील लोकांमध्ये जन आक्रोश निर्माण होऊन पोलीस ठाणे समोर मोठया प्रमाणात जमाव जमला होता. अशा परिस्थीतीत तपासी पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी अतिशय उत्कृष्ठपणे परिस्थीती हाताळुन, त्यांच्या कौशल्याचा वापर करुन सदरचा गुन्हा हा १२ तासात उघडकीस आणुन गुन्हयातील दोन्ही आरोपीताना कसोशिने प्रयत्न करून २४ तासांचे आत अटक केली.

त्यानंतर तपासी अधिकारी यांनी आरोपीला शिक्षा होण्या इतपत पुराव गोळा करून नुमद ओरापी विरूदध सत्र न्यायालय दिंडांशी, गोरेगाव मुंबई येथे स्पेशल केस क्रमांक १५६/१६ अन्वये दोषरोप पत्र दाखल केले. खटल्याच्या प्रत्येक सुनावणीच्यावेळी साक्षीदार, पंच, वैद्यकीय अधिकारी यांना सरकारी पक्षातर्फे बाजु मांडण्याकरीता योग्य मार्गदर्शन करून आरोपीता विरूध्द भक्कम पुरावे उत्कृष्ठरित्या सादर केले व मा. न्यायालयासमक्ष सकारात्मक साक्ष देण्यास प्रोत्साहीत केले. तसेच कोर्ट कारकून, समन्स वॉरंट बजावणी करणारे अंमलदार यांच्या मदतीने अशा प्रकारचे निच कृत्य करणाऱ्या नराधमास जास्तीत जास्त शिक्षा होण्याकरीता सर्व साक्षिदार, पंच, वैद्यकिय अधिकारी यांचा शोध घेवुन त्यांना मा. न्यायालयात

साक्ष देण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आला.

तरी मा. न्यायालयाने ठोठावलेल्या शिक्षेमुळे अशा प्रकारच्या अघोरी अत्याचारास बळी पडलेल्या बळीतांस न्याय मिळाला आहे व नमूद शिक्षेमुळे इतर समाज विघातक कृत्य करण्यास पुन्हा धजावणार नाहीत. अशा प्रकारचे अघोरी कृत्य करणाऱ्या नराधमास शिक्षेपर्यंत पोहचविण्याची उल्लेखनिय कामगिरी तपासी पथकातील तसेच न्यायालयीन कामकाज करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेले आहे.

**कफपरेड पोलीस ठाणे, मुंबई परिमंडळ —०१,तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नाव**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | पोलीस निरीक्षक | विकास महादेव म्हामुणकर | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | म.पो.उप.नि | स्नेहल सुभाष पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पो.उप.नि | विकास बाजीराव झरेकर | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पो.ह.क्र ३२३१६ | रविंद्र नारायण राणे | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पो.शि.क्र.०९०५४८ | स्मीर रघुनाथ धुमाळ | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.शि.क्र १३०२५२ | प्रविण आनंदा यादव | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | म.पो.शि.क्र ०७१३०४ | रोहिणी गणेश जाधव | प्रशस्तीपत्रक |